श्रीगौरी पूजन

IBS

सकाळ

मैत्रेय उद्योग परिवार
आणि सकाळ तर्फे सप्रेम भेट

मैत्रेय
उद्योग परिवार
दूरदर्शी, सर्वस्पर्शी

मैत्रीण वाचा...
आधुनिक युगाची परिपूर्ण स्त्री बना!

व्यक्तिमत्व विकास,
घर, स्वयंपाक,
मुलं, करिअर,
फॅशन, आरोग्य,
फिटनेस
यांसह
स्त्रीविश्वातील
विविध विषयांना
स्पर्श करणारं,
अर्थपूर्ण जगण्याचा
नवा मंत्र देणारं,

दर्जेदार परिपूर्ण मासिक

प्रिय मैत्रीण

मैत्रेय मास कम्युनिकेशन सर्व्हिसेस प्रा. लि.चे प्रकाशन

मैत्रेय

सर्वत्र उपलब्ध

ताजे विषय
सर्वांगीण विचार
नामवंत लेखक

सल्लामसलत
डॉ. मालती कारवारकर
डॉ. लीना मोहाडीकर
डॉ. अंजली पेंडसे

सदरं

- आय डेअर
- हिरवा कोपरा
- सुंदर माझं घर
- लज्जत
- सुरत खुबसुरत
- फॅशन स्ट्रीट
- शॉपिंग विंडो
- औषध तुमच्या घरात

आपली गौराई !

भाद्रपद येतो आणि गौरी गणपतीच्या सोहळ्यासाठी आपण सज्ज होतो. गणपती हे विद्येचे दैवत तर गौरी मांगल्याचं प्रतीक, तेजाची, सुखसमृद्धीची देवता, सर्व मनोरथ पूर्ण करणारी जगन्माता.

भाद्रपदात अनुराधा नक्षत्रावर, सोन्याच्या पावलांनी जेव्हा जेष्ठागौरीचं आगमन होतं तेव्हा घरोघरी उत्सवी वातावरण असतं. दृढ श्रद्धा व उत्कट भक्तीने गौरीचं पूजन होतं.

गौरी पूजन म्हणजे महाशक्तीला नमन. शंकराला जिच्यामुळे शक्तितत्व लाभतं ती महाशक्ती, म्हणजेच पार्वती. समुद्राची अमर्याद विशालता, पर्वताचं स्थिर गांभीर्य आणि मर्यादा, ऋतुचक्र, चंद्र, सूर्य, ग्रहताऱ्यांचा उदय यांच्या मुळाशी असलेलं विश्वव्यापी प्रेरणास्थान.

गौरीचं साग्रसंगीत पूजन करण्याची प्रथा प्राचीन काळापासून आहे. खुद्द सीतेने गौरी पुजून तिचा वरदहस्त मिळविला असं तुलसीरामायण सांगतं. युगं

मैत्री
पॅकड
ड्रिंकिंग वॉटर
भरोसा सच्ची दोस्ती का !

मैत्रेय
उद्योग परिवार
दूरदर्शी, पारदर्शी

लोटली... तरी 'गौरी' ही स्त्रीची जिवाभावाची सखी राहिली. काही घरी नदीकाठावरुन आणलेले दोन खडे तर काही घरी तेरड्याची रोपे अशी प्रतीकात्मक गौर बसवितात तर काही घरी गौर साग्रसंगीत सजते. कागदाचे, मातीचे, पितळेचे, चांदीचे, सोन्याचे मुखवटे असलेली, भरजरी शालू नेसलेली, दागिन्यांनी नटलेली, साजिरी दिसते. घरोघरी त्या त्या घरच्या प्रथेप्रमाणे, परंपरेप्रमाणे पूजा होते.

घरसंसार, नोकरी करिअर, अशी तारेवरची कसरत करणारी आजची स्त्रीही गौरी पूजन तितक्याच उत्कटतेने करते. प्रियजनांचं सुख इच्छिते. यश, संपत्ती, संतती आणि कीर्तीचा वर मागते. आपलं गौरी पूजन साग्रसंगीत, शास्त्रोक्त पद्धतीने व्हावं अशी तिचीही श्रद्धा असते. याच हेतूने, खास आधुनिक स्त्रीसाठी गौरी पूजनाची संपूर्ण माहिती, आरत्यांसह सादर करीत आहोत.

मैत्री
दूध
जसं हवं तस्सं।

अशी करा पूर्वतयारी

पूजेची तयारी, साहित्याची जमवाजमव आधीपासून करुन ठेवावी. त्यामुळे आयत्यावेळेस ताण येत नाही, धावाधाव करावी लागत नाही व पूजा सुरळीत, आनंदाने पार पडते.

गौर आणण्यापूर्वी, गौर आणायची तिथपासून संपूर्ण घरात, प्रत्येक कोपऱ्यात हळद किंवा रांगोळीने पावलांचे ठसे काढावेत. सोन्याच्या पावलांनी गौर घरी येते असं मानतात. त्यासाठीच गौरीची ही पावले काढतात.

सामग्री : सर्व उपकरणी तांब्याची किंवा चांदीची असावीत. ताम्हन, पळी, फुलपात्रे, तांब्या, पूजेचे ताट, समई, निरांजन, घंटा, धूपपात्र, कर्पूरपात्र.

साहित्य : हळद, कुंकू, गंध, अक्षता, अबीर, गुलाल, सुपाऱ्या, नारळ, विड्याची पाने, गूळखोबरे, बदाम, खारका, तांदूळ, गहू, पंचामृतासाठी दूध, दही, तूप, मध, साखर, ५ प्रकारची फळे, सुगंधी तेल, सुटी नाणी.

फुले : कमळ, पारिजात, नागचाफा, सोनचाफा, केवडा, शेवंती, कण्हेर, बकुळ, जाई, जुई, मोगरा, भेंडी, अशोक, जास्वंद.

पत्री : आघाडा, बेल, दुर्वा, मालती, चाफा, कण्हेर, तुळस, रुई, बोरी, बकुळ, डाळिंब, धोत्रा, अशोक.

अलंकार : बांगड्या, मणिमंगळसूत्र, साडी, हिरवी चोळी, खण.

मैत्री
श्रीखंड
स्वाद जो हमेशा रहेगा याद

मैत्रेय
उद्योग परिवार
दूरदर्शी, सर्वस्पर्शी

प्रत्यक्ष पूजा

पूजेच्या वेळी घरात प्रसन्न वातावरण असावे. सर्वजण शुचिर्भूत, स्वच्छ कपड्यात, आनंदी असावेत. उदबत्ती लावावी. कपाळाला कुंकू लावावे. घरातील सर्व देवतांना नमस्कार करुन पूजेला प्रारंभ करावा. समई लावावी.

ॐ केशवाय नमः । ॐ नारायणाय नमः ।
ॐ माधवाय नमः । ॐ गोविंदाय नमः । म्हणून आचमन करावे.

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा ॥

नमस्कार करावा. गणपतीची पूजा करावी. मूर्ती किंवा ताम्हनातील सुपारीवर अक्षता वाहाव्या, पाणी शिंपडावे, पळीतील पाण्यात गंध घालून ते ताम्हनात वाहावे व ३ पळ्या पाणी घालावे. सुपारी पुसून तांदुळाच्या राशीवर ठेवावी. जानवं, तांबडे फूल, हळद, कुंकू, शेंदूर, अष्टगंध, अबीर वाहावा. गंधात बुडवलेल्या दुर्वा गणपतीकडे देठ करुन वाहाव्या. उदबत्ती, निरांजन ओवाळावे. जमिनीवर पाण्याचा चौकोन करुन त्यावर गूळखोबऱ्याची वाटी ठेवावी त्या वाटीभोवती डावीकडून उजवीकडे पाणी फिरवावे. हातावर पळीने पाणी घेऊन ताम्हनात सोडावे. हात जोडून म्हणावे -

मैत्री आम्रखंड
मस्तीभरी मिठास

कार्य मे सिद्धिमायातु प्रसन्ने त्वयि धातरि ।
विघ्नानि नाशमायान्तु सर्वाणि सुरनायक ॥

कलश, घंटा, समई गंधाक्षतांसह पुजावे. स्वतःवर, पूजासाहित्यावर पाणी शिंपडून म्हणावे -

अपवित्र : पवित्रो वा सर्वावस्थां गतोऽपि वा ।
यः स्मरेत् पुण्डरीकाक्षं सबाह्याऽभ्यंतरःशुचिः ॥

देवीला हात लावून म्हणावे -
अस्यै प्राणाः प्रतिष्ठन्तु ।
अस्यै प्राणाः क्षरन्तु च ।
अस्यै देवत्वमर्चायै मामहेत्विचकच्चन ॥

नमस्कार व गौरीचे ध्यान करुन अक्षता वाहाव्या. श्रीगौरी मातेकडे आशीर्वाद, मनोरथ मागावे. आयुरारोग्य चिंतावे. नमस्कार करावा. देवीवर फुलाने पाणी शिंपडावे. साडीचोळी अर्पण करावी. हळदकुंकू वाहावे. काजळ लावावे. बांगड्या, मणिमंगळसूत्र अर्पण करावे. फुले वाहावी. गौरीला हे सर्व स्वीकारण्याचे व आनंदाने वास्तव्य करण्याचे भक्तिपूर्वक आवाहन करावे. निरांजन, धूपारती ओवाळावी. दूध, गूळ, साखर, फळांचा नैवेद्य

दाखवावा. दोन विड्याची पाने, त्यावर एक सुपारी, नाणी ठेवून त्या विड्यावर पळीने पाणी सोडावे. नमन करावे. गौरीमातेच्या सर्वांगावर अक्षता वाहून फुले अर्पावी. म्हणावे -

गौर्यै नमः । पार्वत्यै नमः । शिवायै नमः । उमायै नमः । जगद्धात्र्यै नमः । जगत्प्रतिष्ठायै नमः । शांतिरूपिण्यै नमः । देव्यै नमः । लोकवंद्यायै नमः । काल्यै नमः । भवान्यै नमः । रुद्राण्यै नमः । महादेव्यै नमः । मंगलदात्र्यै नमः । पुत्रदायिन्यै नमः । शक्तिदायिन्यै नमः । दुर्गायै नमः । शर्वाण्यै नमः । चंडिकायै नमः । अर्पणायै नमः । गिरजायै नमः । अंबिकायै नमः ।

पत्री वाहावी व म्हणावे -

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः ।
नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणतास्मि ॥

तीन प्रदक्षिणा घालाव्यात व हात जोडून प्रार्थना करावी.

आवाहनं न जानामि न जानामि विसर्जनम् ।
पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वरि ।
अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।

Maitree
Flavoured Milk
हेल्थ और टेस्ट का थंडा फंडा

मैत्रेय
उद्योग परिवार,
दूरदर्शी, सर्वस्पर्शी

तस्मात्कारुण्यभावेन रक्षस्व परमेश्वरि ।
पुत्रान्देहि धनं देहि सौभाग्यं देहि मंगले ।
अन्यांश्च सर्वकामास्त्वं देहि देवि नमोऽस्तुते ॥

गौरी मातेची कृपादृष्टी मागावी. संकटनिवारण, समृद्धी, आरोग्य, संतति, सौख्याचा आशीर्वाद मागावा. मातेने दरवर्षी येऊन सेवा घ्यावी अशी विनंती करावी. मनातील इच्छा सांगून नमस्कार करावा. 'गौरी माहात्म्य' वाचावे. गौरीची आरती म्हणावी, हातात फुले घेऊन श्रीगौरीला अर्पावी.

शेवटी देवीपुढे नारळ ठेवून प्रार्थना करावी.

काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी ।
देशोऽयं क्षोभरहितो ब्राह्मणाः संतु निर्भयाः ॥
अपुत्राः पुत्रिणः संतु पुत्रिणाः संतु पौत्रिणः ।
अधनाः सधनाः संतु । सर्वे संतु जीवन्तु शरदः शतम् ।
सर्वेजनाः सुखिनो भवन्तु ॥ तथास्तु ॥
सर्वेजनाः सुखिनो भवन्तु ॥ तथास्तु ॥
सर्वेजनाः सुखिनो भवन्तु ॥ तथास्तु ॥

Maitree Dahi
संपूर्ण संतोष का दूसरा नाम

मैत्रेय

गौरीच्या पूजेसाठी नैवेद्य

गौरीचा पारंपरिक नैवेद्य घरोघरी प्रथेप्रमाणे व भक्तिभावाने बनविला जातो. वैविध्यपूर्ण व स्वादिष्ट नैवेद्य मांडतानाही कलात्मक सजावट केली जाते.

पहिल्या दिवसाचा नैवेद्य :

भाकरी (बाजरीची), मेथीची भाजी, खीर, वडे, काकडीची तवसळी, तांदळाचे अनरसे, खाजाच्या करंज्या, रव्याचे, बुंदीचे व बेसनाचे लाडू.

दुसऱ्या दिवसाचा नैवेद्य :

पुरणपोळी

सोळा भाज्या - यात भिजवलेली मटकी, श्रावण घेवडा, गवार, ढोबळी मिरची, कोबी, फ्लॉवर, बटाटा, घोसाळा, पडवळ, दोडका, अळू, भेंडी, दुधी भोपळा, लाल भोपळा, गाजर, काकडी, यांची एक एकत्रित भाजी करतात. काही ठिकाणी अळूची पातळ भाजी, बटाट्याची भाजी, भेंड्याची भाजी निरनिराळी करतात. इतर भाज्यांची एकत्र भाजी करतात. कांदा घालत नाही.

मैत्री लस्सी

चटणी - ओले खोबरे, हिरव्या मिरच्या, कोथिंबीर यांची बारीक वाटलेली चटणी.

कोशिंबीरी - बीट, मुळा, टोमॅटो, गाजर, काकडी यांची एकत्र करुन केलेली कोशिंबीर. मोसंबी, संत्रे, डाळींब, केळे, चिकू, सफरचंद या फळांची दही, दूध, साखर घालून केलेली कोशिंबीर.

कटाची आमटी - पुरण करताना थोडेसे पुरण, शिजवलेल्या डाळीचे पाणी, यांना कढीपत्ता, मोहरी, जिरे, लवंगा, हिंग यांची फोडणी, देऊन चिंच, गूळ, खवलेले खोबरे किंवा जिरे व सुके खोबरे भाजून-कुटून, तिखट इ. घालून केलेली आमटी.

भजी - घोसाळा, बटाटा, पालकाची पाने, राजेरी केळी, अळूची पाने, मिरची चण्याच्या पिठात तिखट, मीठ, हळद, हिंग घालून, कालवून केलेली भजी.

वड्या - अळू व कोबीच्या.

भात - मसाले भात, साधा भात, वरण, ताक, कढी.

पाकातल्या पुऱ्या - बारीक रवा व मैदा, केशर, दही व तेल घालून मळून तास-दीड तास भिजवून ठेवावे. नंतर त्याच्या पुऱ्या लाटून तुपात तळून साखरेच्या पाकामध्ये टाकाव्या.

मैत्री
शुध्द घी
मानो माँ का प्यार!

रव्याची गोड पुरी - गुरवळी. रवा साखरेची तळलेली करंजी.

खीर - हा नैवेद्यातला महत्वाचा पदार्थ आहे. दुध व तांदूळाची, गव्हाची, शेवयाची किंवा भोपळ्याची खीर करावी, त्यात दूध जास्त प्रमाणात असावे.

तिसऱ्या दिवसाचा नैवेद्य :

घावन घाटलं हा पदार्थ गौरीच्या पूजेसाठी केलेल्या नैवेद्याचा अविभाज्य भाग आहे.

घावन - तांदूळ धुवून, वाळवावेत, दळून, जिरे, घालून त्याचे धिरड्यासारखे पीठ भिजवावे. बिडाच्या तव्यावर पातळसर गोल आकारात घालून घावन करावे.

घाटलं - तांदळाचे पीठ, मीठ, ओले खोबरे, किसलेला गूळ, वेलदोडे पूड एकत्र पाण्यात मिसळून उकळावे. घट्ट झाल्यावर उतरावे.

कानोला - पुरण आणि गव्हाच्या पिठाचा पदार्थ. गव्हाचे पीठ भिजवून नंतर त्याच्या पुऱ्या लाटाव्या. त्यात पुरण भरावे. करंज्यासारखे अर्धे दुमडून, मुरड घालून तळावे.

गव्हल्यांची खीर - गव्हले, साखर, वेलदोडे, जायफळ, तूप आणि जास्त दूध घालून स्वादिष्ट खीर बनवावी.

मैत्रेय
प्लॉटिंग अँड कन्स्ट्रक्शन
जीवनशैलीला नवा अर्थ देणारे अत्याधुनिक गृहप्रकल्प



आरती गणपतीची

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदूराची । कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥१॥

जय देव जय देव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रें मनकामना पुर्ती ॥धृ०॥
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुमकेशरा ।
हिरेजडित मुगुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ॥२॥

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना । संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रें मनकामना पुर्ती ॥३॥

मैत्रेय क्लब
शरीर आणि मन समृद्ध करणारी अद्ययावत क्लब्ज्ची साखळी

मैत्रेय
उद्योग परिवार
दूरदर्शी, सर्वस्पर्शी

दुर्गादेवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं ॥
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं ॥
वारीं वारीं जन्ममरणातें वारीं ॥
हारीं पडलों आतां संकट नीवारीं ॥१॥

जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी ॥
सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ॥ जय० ॥धृ०॥

त्रिभुवन भुवनीं पहातां तुज ऐसी नाहीं ।
चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं ॥
साही विवाद करितां पडले प्रवाहीं ॥
ते तूं भक्तांलागीं पावसि लवलाही ॥ जय० ॥२॥

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा॥
क्लेशापासुनि सोडीं तोडीं भवपाशा॥
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा॥
नरहरि तल्लिन झाला पदपंकज लेशा ॥ जय० ॥३॥

मामाचा गाव
ग्रामीण जीवनातील सच्चेपणा आणि निरागसता जपणारा रिसॉर्ट

शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ॥ वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ॥ लावण्यसुंदर मस्तकीं बाळा ॥ तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ॥१॥ जय देव जय देव जय श्रीशंकरा ॥ आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा ॥धृ०॥

कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा ॥ अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ॥ विभूतीचें उधळण शितिकंठ नीळा ॥ ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥जय०॥२॥

देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें । त्यामाजी अवचित हलाहल जे उठिलें । तें त्वां असुरपणें प्राशन केलें ॥ नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥जय०॥३॥

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ॥ पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ॥ शतकोटींचें बीज वाचे उच्चारी ॥ रघुकुळटिळक रामदासा अंतरी ॥जय०॥४॥

मैत्रेय
मेगानेट
जिथे ग्राहकच बनतो उद्योजक

श्रीदत्ताची आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ॥ त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ॥ नेति नेति शब्द न ये अनुमाना ॥ सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ॥१॥ जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता ॥ आरती ओवाळीतां हरली भवचिंता ॥ धृ० ॥

सबाह्य अभ्यंतरी तूं एक दत्त ॥ अभाग्यासी कैंची न कळे ही मात ॥ पराही परतली तेथें कैंचा हा हेत ॥ जन्ममरणाचा पुरलासे अन्त ॥ जय० ॥२॥

दत्त येऊनीयां उभा ठाकला ॥ भावे साष्टांगेसे नमुनी प्रणिपात केला ॥ प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला ॥ जन्ममरणाचा बा फेरा चुकविला ॥जय० ॥३॥

दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान ॥ हरपलें मन झालें उन्मन ॥ मीतूंपणाची झाली बोळवण ॥ एका जनार्दनीं श्रीदत्त जाण ॥४॥ जय देव जय देव जय० ॥

पांडुरंगाची आरती

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ॥ वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥ पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा ॥ चरणीं वाहे भीमा उद्धरीं जंगा ॥१॥ जय देव जय देव जय पांडुरंगा ॥ रखुमाईवल्लभा राहीच्या वल्लभा पावें जिवलगा ॥जय० ॥ धृ० ॥

तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटीं ॥ कांसें पीतांबर कस्तुरि लल्लाटीं ॥ देव सुरवर नित्य येती भेटी ॥ गरुड हनुमंत पुढें उभे राहती ॥ जय०॥ २ ॥

धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ॥ सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ॥ राही रखुमाबाई राणीया सकळा ॥ ओंवाळिती राजा विठोबा सांवळा ॥ जय०॥ ३ ॥

ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती ॥ चंद्रभागेमाजी सोडुनियां देती ॥ दिंड्या पताका वैष्णव नाचती ॥ पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ जय० ॥ ४ ॥

आषाढी कार्तिकी भक्तजन येती ॥ चंद्रभागेमाजीं स्नानें जे करिती ॥ दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ती ॥ केशवासी नामदेव भावें ओंवाळिती ॥ ५ ॥

प्रार्थना

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ॥
प्रेमें आलिंगिन आनंदे पूजिन ।
भावें ओंवाळिन म्हणे नामा ॥१॥
त्वमेव माता च पिता त्वमेव ।
त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ॥
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देव देव ॥२॥
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा,
बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात्
करोमि यद्यत् सकलं परस्मै ।
नारायणायेति समर्पयामि ॥३॥
अच्युतं केशवं रामनारायणं
कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् ॥
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं
जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥४॥
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ॥
हरे कृष्ण हरे कृष्ण
कृष्ण कृष्ण हरे हरे ॥५॥

मंत्रपुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवाःतानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः। ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः । ॐ स्वस्ति साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठ्यं, राज्यं, महाराज्यमाधिपत्यमयं। समंतपर्यायीस्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंतायाः एकराळिति तदप्येष:श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे । आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवा सभासद इति ॥ सार्थ मंत्रपुष्पांजलि समर्पयामि ॥

सकाळ

॥ मित्र नव्या शतकातला ॥

पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, सोलापूर आणि नागपूर

'सकाळ'ची प्रकाशने

युवा सकाळ

युवकांसाठीचे एकमेव मराठी दैनिक

साप्ताहिक सकाळ

प्रत्येक कुटुंबासाठी, कुटुंबातील प्रत्येकासाठी

अर्थमंथन

अर्थ-उद्योग- गुंतवणूकविषयक सर्वकाही...

क्रीडाविश्व

क्रीडाविश्वाचा सर्वांगीण वेध

मधुरा

महिलांसाठी सक्षम व्यासपीठ (दर शनिवारी)

बालमित्र

खास छोट्या दोस्तांसाठी (दर शुक्रवारी युवासकाळसोबत)

उत्तररंग

ज्येष्ठांचे..सर्वांसाठी षण्मासिक

esakal.com ॥ मराठी मन, जागतिक स्पंदन ॥

मैत्रेय...
इथे स्वप्नांना सत्याचा स्पर्श होतो

मामाचा गाव
ग्रामीण जीवनातील
सच्चेपणा आणि निरागसता
जपणारा रिसॉर्ट

मैत्री
पॅकेज ड्रिंकिंग वॉटर
सच्च्या मैत्रीसारखं विश्वासार्ह.
स्वच्छता, शुद्धता व
सुरक्षितता याची हमीच.

मैत्रेय क्लब
शरीर आणि मन
समृद्ध करणारी अद्ययावत
क्लब्ज्ची साखळी

मैत्री दूध
आणि दुग्धजन्य पदार्थ
श्रीखंड, आम्रखंड, पनीर,
फ्लेवर्ड मिल्क, दही

मैत्रेय
प्लॉटिंग अँड कन्स्ट्रक्शन
जीवनशैलीला नवा अर्थ देणारे
अत्याधुनिक गृहप्रकल्प

मैत्रेय मेगानेट
जिथे ग्राहकच
बनतो उद्योजक

मैत्रेय फाउंडेशन
शिक्षण, आरोग्य, संस्कृती
आणि सामाजिक विकास
यांसाठी निरंतर काम

मैत्रेय
उद्योग परिवार
दूरदर्शी, सर्वस्पर्शी